# इयत्ता ३ री – पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र १ – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| गाणे<br><br>वार, दिनांक | सात जणांचा गट तयार करणे. सात वारांचे गाणे–<br>कृती खालीलप्रमाणे–<br>विद्यार्थ्यांना वारांच्या शब्दपट्ट्या देऊन वारांची गाडी करून म्हणून घेणे. दररोजचा वार, दिनांक विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल अशा पद्धतीने उच्चारून निर्देशित करून लिहिणे. | गटांची, वारांची गाडी करून गाणे म्हणणे. गटात वारांची नावे क्रमाने सांगणे. सरावानंतर दररोज वार, दिनांक सांगणे. वार, अंक इ. ची गाणी म्हणणे. | वारांची नावे माहीत होतात. दिनांक सांगण्याची पद्धती समजते. | मराठीतील वारांची नावे समजल्याचा आनंद होतो. | गाणे चालीत म्हणतात. दररोजचा वार, दिनांक सांगतात. | तोंडी काम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| चित्रशब्दपट्ट्या | परिचित असणाऱ्या वस्तू, प्राणी, फळे, फुले इ. चित्रे व त्यांची नावे असणारी कार्डे दाखविणे. चित्रे व नावे निर्देशित करून ती ओळखण्याचा खेळ घेणे. | गटात चित्रांच्या आधारे नावे, नावांच्या आधारे चित्र ओळखण्याचा खेळ खेळणे. चित्र–शब्द, शब्द–शब्द यांच्या जोड्या लावण्याचा खेळ खेळणे. | चित्रे व नावे यांचे सहसंबंध समजतात. शब्दांचे आकार समजतात. | खेळांची मजा घेतात. | इतर नावे ओळखण्याचा प्रयत्न करतात. | कृती/उपक्रम |
| शब्दपट्ट्या (क्रियादर्शक शब्द) | 'राजा म्हणतो....(परिचित खेळ) क्रियादर्शक शब्दांचा उच्चार न करता शब्दपट्ट्या दाखवून खेळण्यास सांगणे. | पाहिलेल्या शब्दाच्या आधारे कृती करण्याचा खेळ खेळणे, उच्चारणे. शब्दपट्ट्या वाचणे. | दृक्शब्द ओळखून कृतीशी सांगड घालण्याची जाण येते. | खेळाची मजा घेतात. | इतर शब्द ओळखण्याचा प्रयत्न करतात. | कृती/उपक्रम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| चित्रवर्णन | विद्यार्थ्यांना परिचित असणाऱ्या वस्तूंचे, चित्रांचे वर्णन त्यांच्याच मदतीने करणे, त्यात वापरल्या गेलेल्या शब्दांचे फलक लेखन करणे, त्याच शब्दांच्या शब्दपट्ट्या तयार करून वाचण्यास देणे. | मराठीतून चित्रवर्णन करण्याचा प्रयत्न करणे. फलकांवरील शब्द पाहणे. चित्रपट्ट्यांवरील शब्द वाचणे. | वर्णनात वापरलेल्या शब्दांचे आकार समजतात. | नवीन शब्द ओळखण्याचा आत्मविश्वास वाढतो. स्वतः सांगितलेले शब्द वाचण्याचा आनंद वाढतो. | वेगवेगळे शब्द वाचण्याचा प्रयत्न करतात. | कृती/उपक्रम |
| मजकूर | खेळातून, वर्णनातून परिचित झालेल्या 'शब्दांची बाग' तयार करणे. या शब्दांपासूनच विद्यार्थ्यांच्या मदतीने चार ते | 'शब्दबागे'तून शब्द निवडून स्वतःचा मजकूर तयार करणे. इतरांनी तयार केलेले मजकूर वाचणे. | शब्दांच्या साह्याने मजकूर लेखन कसे करायचे ते समजते. | मराठी वाचनाचा आत्मविश्वास वाढतो. | शब्द बदलून वेगवेगळे मजकूर तयार करतात. मजकूर वाचण्याचा प्रयत्न करतात. | तोंडीकाम (मजकूर वाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | पाच वाक्यांचे मजकूर तयार करणे. कार्डावर लिहिणे. मजकुरांचे प्रकटवाचन करणे. | | | | | |
| शब्दसंपत्ती | जसजशी मुळाक्षरे, स्वरचिन्हे परिचित होत जातील तसतसे त्यांच्या साहाय्याने नवनवीन शब्द तयार करण्याचा खेळ घेणे. | मुळाक्षरे व स्वरचिन्हे यांची वेगवेगळ्या पद्धतीने जुळणी करत नवनवीन शब्द तयार करण्याचा खेळ खेळणे. | शब्द तयार करण्याची रीत समजते. | स्वतः शब्द तयार करण्यात आनंद वाटतो. | शब्द तयार करतात, वाचतात. | उपक्रम |
| नाणी, नोटांची नावे | नाणी, नोटा प्रत्यक्ष हाताळण्यास देणे. त्यांची नावे सांगणे. पालकांच्या सहकार्याने प्रत्यक्ष वापर करण्याविषयी | गटात नाणी, नोटा ओळखण्याचा खेळ खेळणे. व्यवहारात पालकांच्या सहकार्याने नाणी, नोटांचा प्रत्यक्ष वापर करणे. | नाणी, नोटांची मराठी नावे समजतात. | व्यवहारात मराठी वापराविषयीचा आत्मविश्वास वाढतो. | गरजेनुसार नोटा, नाण्यांच्या मराठी नावांचा व्यवहारात वापर करतात. | उपक्रम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | सूचना देणे. वस्तू, त्यांच्या किमती याविषयी गटात माहिती देण्यास सांगणे. त्या अनुषंगाने मराठी अंकांच्या नामांचा परिचय देणे. | त्या अनुभवाची माहिती गटात देणे. | | | | कृती/उपक्रम |
| संख्यांची, अंकांची नावे | वर्गात प्रति बाजार भरविणे. त्यावेळी देवाण-घेवाणीतून मराठी अंकांच्या संख्यांच्या नावांचे दृढीकरण करणे. | प्रतिबाजारात विक्रेते-ग्राहक या भूमिका पार पाडताना मराठी व मराठी अंक व संख्यांच्या नावांचा वापर करतात. | मराठी संख्यांची नावे समजतात. | आत्मविश्वास वाढतो. | व्यवहारात मराठी भाषा वापरतात. | उपक्रम |
| नात्यांची नावे | स्वतःचे नाव व नाती समजावून सांगणे. नाती व त्याखाली रिकामी जागा असणारा | गटात आपल्या कटुंबातील व नात्यातील व्यक्तींची नावे सांगणे. | नातेसंबंध व नात्यांची नावे समजतात. | व्यवहारात मराठी वापराविषयीचा आत्मविश्वास वाढतो. | उचित नात्यांच्या नावाने संबोधतात. | प्रकल्प |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | 'कुटुंबवृक्ष' पालकांच्या मदतीने तयार करण्यास सांगणे. वर्गासमोर तो सादर करण्यास सांगणे. | पालकांच्या मदतीने कार्डावर नाती व नातेवाईकांची नावे लिहून 'कुटुंबवृक्ष' तयार करणे. मित्रांना व शिक्षकांना कुटुंबवृक्षातील व्यक्तींची थोडक्यात माहिती देणे. | | | | |

## अध्ययन क्षेत्र २ – भाषिक नियमव्यवस्थेचा परिचय

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| मुळाक्षरे, स्वरचिन्हे | उच्चारण लक्षात घेऊन समान आद्याक्षर वा अंत्याक्षर असणाऱ्या किमान तीन शब्दांचा गट सुरवातीस सुलभकाने तयार करणे. सुरवातीच्या वा शेवटी कोणता आवाज येतो या आधारे उदाहरणात दाखविल्याप्रमाणे मुळाक्षर व स्वरचिन्ह परिचय करून घेण्यास मदत करणे. असेच शब्दगट विद्यार्थ्यांना तयार करण्यास सांगणे. उच्चारणाचा संबंध अक्षरचिन्हांशी जोडणे. विद्यार्थ्यांना मुळाक्षरांना जोडलेली स्वरचिन्हे शोधण्यास सांगणे. | उच्चारणाच्या आधारे, एकाच अक्षराने सुरू वा शेवट होणारे शब्दांचे गट तयार करणे. बाईंना फळ्यावर लिहिण्याची विनंती करणे. मुळाक्षरे, स्वरचिन्हे स्वतः शोधणे. | उच्चारणाचा अक्षरचिन्हांशी असलेला सहसंबंध समजतो. | मुळाक्षरे, स्वरचिन्हे स्वतः शोधल्याचा आनंद वाढतो. | वेगवेगळ्या शब्दांतील मुळाक्षरे, स्वरचिन्हे शोधतात. | तोंडी काम (मुळाक्षर, स्वरचिन्ह वाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | उदा.<br>सोमवार्, मंगळवार्, बुधवार् } र<br>उठा, बसा, जा } ा = आ<br>उर्वरित काही मुळाक्षरांना वा स्वरचिन्हांना दृक् शब्दसंपत्तीतील शब्दांतून शोधण्यात मदत करणे. उदा. कमळ = ळ | गटात एक वा दोन दृक्शब्दात आलेली उर्वरित मुळाक्षरे ओळखण्याचा खेळ खेळणे.<br>मुळाक्षरे व स्वरचिन्हे यांचा परिचय करून घेणे. | | | | |
| | विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत नसलेल्या मुळाक्षरे, स्वरचिन्हांचा प्रत्यक्ष परिचय करून देणे.<br>मुळाक्षरे, बाराखडीच्या तक्त्याचे वाचन घेणे. | मुळाक्षरे, बाराखडी तक्त्याचे अनुवाचन व वाचन करणे. | मुळाक्षरे, बाराखडीचा क्रम समजतो. | आत्मविश्वास वाढतो. | मुळाक्षरे व बाराखडीचे वाचन करतात. | तोंडी काम (मुळाक्षर व बाराखडी वाचन) |

## अध्ययन क्षेत्र – भाषिक नियमव्यवस्थेचा परिचय

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| उच्चारस्थान | क, च, ट, त, प या वर्गातील अक्षरांपासून सुरू होणारी व उच्चारस्थाने एकच असणारी मुळाक्षरे ओळखण्याचा खेळ घेणे. उच्चारस्थानावरून घसावाले, ओठवाले, दातवाले, टाळावाले असे वर्गीकरण करणे. | उच्चार स्थानांवरून मुळाक्षरांचे गट करण्याचा खेळ गटात खेळतात. | अक्षरांची उच्चारस्थाने समजतात. | उच्चारणाची मजा अनुभवतात. | मुळाक्षरांचे योग्य उच्चारण करतात. | प्रात्यक्षिक |
| अक्षरावयव | फळ्यावर एक अक्षर काढणे. उदा. ट. अक्षरावयवांच्या आधारे कोणकोणती अक्षरे तयार होतात हे विचारणे. उदा. ट, ठ, द, ड, ई | अक्षरावयवांपासून तयार होणारी विविध अक्षरे सांगणे व लिहिणे. | अक्षरावयवातील फरक ओळखतात. | अक्षरलेखनात आनंद वाटतो. | स्वतःहून अक्षरे लिहितात. | प्रात्यक्षिक |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| वाक्य | मी, आम्ही ही दर्शक सर्वनामे व आहे, आहोत ही क्रियापदे घेणे. त्यांचा वापर करून गटात वाक्यसाचे तयार करून घेणे. वाचन घेणे. उदा. मी तिसरीत आहे. आम्ही तिसरीत आहोत. | वेगवेगळे दृक्शब्द वाक्यसाच्यात वापरून वाक्य वाचनाचा खेळ घेणे. | वाक्यरचना समजते. | मराठी वाचनाचा आत्मविश्वास वाढतो. | वेगवेगळी वाक्ये वाचण्याचा प्रयत्न करतात. | तोंडी काम (वाक्यवाचन) |